
# सकाळ

# अभियांत्रिकी क्षेत्रातील मैलाचा दगड



जगातील सर्वाधिक उंचीवरील 'सिंगल आर्क' म्हणजे एकच कमान असलेल्या काश्मीरमधील चिनाब रेल्वेपुलाचे उद्‍घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी करणार आहेत. कटरा-श्रीनगर वंदे भारत सेवेचेही लोकार्पण या वेळी होईल. अभियांत्रिकी क्षेत्रातील मैलाचा दगड मानला गेलेल्या या पुलाबद्दल...

## कसा आहे प्रकल्प?

- उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंक प्रकल्पाचा भाग
- नदीच्या पातळीपासून ३५९ मीटर उंचीवर बांधलेला हा पूल जगातील सर्वात उंच रेल्वे पूल आहे.
- हा पूल पॅरिसमधील आयफल टॉवरपेक्षा ३५ मीटर उंच आहे.
- २,८६,६०,००० किलो लोखंडाचा वापर करून हा पूल बांधण्यात आला आहे.
- पूल बांधण्यासाठी चौदाशे कोटींपेक्षा जास्त खर्च आला.
- हा पूल डोंगराळ आणि भौगोलिकदृष्ट्या अवघड भागात बांधण्यात आला आहे.
- चिनाब नदीवरील या रेल्वेपुलाचे बांधकाम एफकॉन्स इंफ्रास्ट्रक्चर या कंपनीने केले.

**२७२** किलोमीटर
उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला प्रकल्पाची लांबी

**४२,०००** कोटी रुपये
संपूर्ण प्रकल्पासाठी अंदाजित खर्च

**१४८६** कोटी रुपये
चिनाब रेल्वे पुलासाठी आलेला खर्च

**८** रिश्टर स्केल
भूकंप सहन करण्याची क्षमता

**३५९** मीटर
पुलाची उंची

**१.३१** किलोमीटर
पुलाची लांबी